नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २३४ * * अकोला * सोमवार, दिनांक १७ फेब्रुवारी २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

## न्यू इंडिया बँकेचा महाव्यवस्थापक अटकेत

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :

न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेचा महाव्यवस्थापक व लेखा विभागाचा प्रमुख हितेश मेहता याला अटक करण्यात आली. बँकेच्या प्रभादेवी व गोरेगाव येथील कार्यालयातील १२२ कोटी रुपयांचा अपहार केल्याचा आरोप आहे. हे प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आले. प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी देवर्षी घोष यांनी केलेल्या तक्रारीवरून शनिवारी दादर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. हितेश मेहताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी व त्याच्या साथीदारांनी फौजदारी कट रचून त्याच्या ताब्यात देण्यात आलेल्या प्रभादेवी व गोरेगाव शाखेतील तिजोरीमधील १२२ कोटी रुपयांचा अपहार केल्याचा आरोप आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## आधी वाट-वाट, आता काट-काट

राजकारणात सत्ता मिळवण्यासाठी सामान्य मतदारांना आकर्षित करणाऱ्या अनेक योजना भारतातील राज्य सरकारांना आश्वासित कराव्या लागतात. हे आश्वासितकरण आणि आश्वासितांना दिलेल्या वचनांच्या परिणामांची चर्चा निवडणुकीच्या प्रचारात करायची गरज नसते. महाराष्ट्रातही लोकसभा निवडणुकीत आपल्या महाविकास आघाडीने त्यांच्या जागांचा जो विकास केला होता. त्याला काटशह देणे आपल्या महायुतीला अत्यावश्यक होते. कोणतेही आश्वासन प्रत्यक्षात उतरलेले दिसले की, त्याचा मतदारांवर सकारात्मक प्रभाव दिसतो. ही आश्वासने म्हणजे जादूगाराने रिकाम्या पोतडीतून नोटा काढून दाखवल्यानंतर जसे प्रेक्षक टाळ्या वाजवतात. तशाच प्रकारे ही आश्वासने त्या काळात प्रचंड आश्वासकच वाटतात. विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहिता पूर्व कालावधीत महाविकास आघाडी आणि महायुतीकडून कितीकिती योजना घोषित करण्यात आल्या. हे आता आम्हाला तरी आठवत नाही. त्याच काळात मागेल त्याला महामंडळ, अशा अनेक महामंडळाची बहारदार घोषणा झाली. सर्वात महत्त्वाची गोष्ट होती, ती म्हणजे मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणींची. याशिवाय जेष्ठ नागरिकांना तीर्थ दर्शन, आनंदाचा शिधा आणि इतर अनेक मनमोहक घोषणांनी महायुतीला असे काही भरभरून दिले गेले. अनेक योजनांच्या घोषणांमुळे महायुतीच्या खिशात इतकी मते पडली की, त्या मतांच्या वजनामुळे तो मजबूत खिसाही टराटरा फाटू लागला. मग प्रचंड बहुमत मिळाल्यानंतर सरकार बनवण्यासाठी प्रचंड अडचण, मंत्रिमंडळ स्थापन करायला महाप्रचंड अडचण, खाते वाटप करण्यासाठी परमप्रचंड अडचण, त्यावर जिल्ह्याचे शिलेदार नेमताना अडचणच अडचण अशी स्थिती होती. पण सध्याचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अडचणी आणि अडथळ्यांचा डोंगर लीलया ओलांडला. छोट्या-मोठ्या कुरबुरी हळूहळू आपोआपच जिरल्या. आता सरकारची गाडी वेगाने धावणे सुरू झालेले आहे. वेगाने धावणाऱ्या गाडीला इंधनही खूपच लागते. सध्याच्या सरकारची आवक आणि सरकारचा खर्च तसेच घोषित योजनांना मूर्त स्वरूप देण्याचा खर्च यात दरवर्षी दोन लाख कोटी रुपये तूट येत आहे. असे दिसून आलेले आहे. मग आधी सरकारने वाट-वाट करत जी वाट धरली ती चालू ठेवणे कसे बरे शक्य होईल, असा प्रश्न पडला. आता दिलेल्या घोषणा बंद केल्या तर बदनामी होईल. म्हणून इतर उपाय योजनांसाठी आपले रोखठोक उपमुख्यमंत्री आणि अर्थ मंत्री म्हणजेच वित्तमंत्री अजित पवार यांनी आता आपली कात्री चालवण्याचा सपाटा सुरू केलेला आहे. आता सरकारने सरकारी खर्चात ३० टक्के कपातीचे निर्देश जाहीर केलेले आहेत. ज्या लाडक्या बहिणी श्रीमंत किंवा निमश्रीमंत असतील आणि त्या जर निकषांमध्ये पात्र ठरत नसतील. तर आतापर्यंत त्यांना मिळालेली ओवाळणी त्यांनी गोड मानून घेण्याचा सल्ला सरकार त्यांना देणार आहे. सत्ता दर्शनानंतर, तीर्थदर्शन करण्याच्या ज्येष्ठ नागरिकांच्या आशेला आता प्रत्यक्षात उतरवणे शक्यच नाही. पन्नास हजार महिलांना गुलाबी रंगांच्या रिक्षांचे वाटप, मागेल त्याला सौरऊर्जा युनिट, साडेसात हॉर्स पॉवरचा कृषी पंप मोफत अशा प्रकारच्या योजना बंद करण्यात येणार आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाला ७०००० कोटी हवे आहेत. त्यासाठी तिथले ठेकेदार बेंबीच्या देठापासून बोंबा मारत आहेत. सरकारच्या इंधन खर्चामध्ये २० टक्के कपात करण्यात येणार आहे. राज्यातील एकूण भांडवली खर्चात ३० टक्के कपात करण्यात येणार आहे. गतवर्षी भरभरून निधी उपलब्ध करून दिलेल्या योजनांसाठी जी तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली होती. त्यापैकी ७० टक्केच निधी खर्च करावा, असे आदेश वरून आलेले आहेत. आतापर्यंत जो निधी खर्च झाला नसेल. तो परत करण्याचे आदेशही लवकरच निघू शकतात. अर्थात हे सर्व करणे सरकारसाठी अत्यावश्यक आहे. त्यामुळे सरकारचा गाडा चालवण्यासाठी आता आपल्या वित्तमंत्र्यांना कठोर निर्णय घेणे क्रमप्राप्त आहे. महाराष्ट्राच्या जनतेनेही या सर्व अडचणी समजून घेतल्याच पाहिजेत. उदार मनाने जास्त उधारी न वाढवता सरकारला सर्वांनीच आशीर्वाद दिले पाहिजेत. आपल्याकडे असलेले अंथरूण बघूनच आपण आपले पाय पसरले पाहिजेत. हे आता आपणही समजून घेतले पाहिजे. शेवटी सरकार आपलेच आहे. वित्तमंत्री म्हणजेच अर्थमंत्री आपलेच आहेत. जनताही सध्या थोडीशी तापली आहे. पण त्यावर थंड पाण्याचा शिडकावा करून हे सर्व सहन करण्याची आपण तयारी ठेवली पाहिजे. महाराष्ट्राची श्रीमंती अजूनही तशीच कायम आहे. त्यामुळे आधीच्या वाट-वाट नंतर आताच्या काट-काटला शांतपणे वाट दाखवणे आपणा सर्वांना भागच आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# दिल्लीतील चेंगराचेंगरीतील मृतांची संख्या वाढण्याची शक्यता ?



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १६ :

उत्तर प्रदेशच्या प्रयागराजमध्ये महाकुंभमेळा सुरू असून, दिल्लीतूनही मोठ्या संख्येने लोक महाकुंभात शाही स्नान करण्यासाठी जात आहेत. नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरून महाकुंभासाठी येथून दोन विशेष गाड्या चालवल्या जात आहेत. यामध्ये चढण्यासाठी मोठ्या संख्येने प्रवासी आले होते.

यामुळे प्लॅटफॉर्म क्रमांक १४ आणि १५ वर काल रात्री चेंगराचेंगरी झाली. या घटनेत १८ जणांचा मृत्यू झाला तर १० पेक्षा जास्त प्रवासी जखमी झाले आहेत. तर यात मृतांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे. जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. केंद्रीय मंत्री अश्विन वैष्णव यांनी या प्रकरणी माहिती दिली आहे.

शनिवारी रात्री नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीत १८ जणांचा मृत्यू झाला आहे तर १० पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. ही चेंगराचेंगरी प्लॅटफॉर्म क्रमांक १४ आणि १५ वर झाली. ही घटना, रात्री ९:५५ वाजता घडली. खरंतर, कुंभमेळ्याला जाण्यासाठी नवी दिल्ली रेल्वे स्टेशनवर मोठी गर्दी झाली होती.

दरम्यान, प्लॅटफॉर्म क्रमांक १४ आणि १५ वर प्रचंड गर्दी झाल्याने ही दुर्दैवी घटना घडली. दरम्यान नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीनंतर प्रयागराज जंक्शनवरील सुरक्षा व्यवस्थाही कडक करण्यात आली आहे. रेल्वे स्थानक परिसरासह फूट ओव्हर ब्रिजवरील व्यवस्थेची जबाबदारीची सूत्रे आरपीएफ कर्मचाऱ्यांनी आपल्या हाती घेतली आहेत. या घटनेबाबत बोलताना केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरील परिस्थिती आता नियंत्रणात आहे. दिल्ली पोलीस आणि आरपीएफ घटनास्थळी पोहोचले आहेत. जखमींना रुग्णालयात नेण्यात आले आहे. गर्दी नियंत्रित करण्यासाठी विशेष गाड्या चालवल्या जात आहेत.

दरम्यान, या घटनेनंतर दिल्लीच्या मुख्यमंत्री अतिशी यांनीही दुःख व्यक्त केले आहे. नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेगरीत महाकुंभमेळ्याला जाणाऱ्या भाविकांचा दुर्दैवी मृत्यू अत्यंत दुःखद आणि हृदयद्रावक आहे. मी एलएनजेपी रुग्णालयात पोहोचली असून पीडितांच्या कुटुंबीयांना भेटली आहे. यामध्ये अनेक लोक जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

### मृतांच्या कुटुंबियांना १० लाख रुपयांची मदत

नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरील चेंगराचेंगरीत मृत्युमुखी पडलेल्या मृतांच्या कुटुंबियांना १० लाख रुपयांची भरपाई जाहीर करण्यात आली आहे. त्याचबरोबर गंभीररित्या जखमी झालेल्यांना २.५ लाख रुपये आणि किरकोळ जखमींना १ लाख रुपये भरपाई देण्यात येणार आहे, अशी माहिती रेल्वे प्रशानासनाने दिली आहे. रेल्वे बोर्डाचे कार्यकारी संचालक (माहिती आणि प्रसिद्धी) दिलीप कुमार यांनी रविवारी सांगितले की, नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरील चेंगराचेंगरीची चौकशी करण्यासाठी आणि घटनेमागील कारणे शोधण्यासाठी दोन सदस्यांची उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. त्याच वेळी, नवी दिल्ली रेल्वे स्टेशन घटनेतील पीडित आणि मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्यात येणार आहे. यामध्ये मृतांच्या कुटुंबियांना १० लाख रुपयांची भरपाई, गंभीर जखमींना २.५ लाख रुपये आणि किरकोळ जखमींना १ लाख रुपयांची भरपाई देण्यात येणार आहे.

## धस-मुंडे भेटीने कुठलाही फरक पडत नाही : फडणवीस



■ महासागर प्रतिनिधी, जळगाव, दि. १६ :

दोन दिवसांपूर्वीच सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांच्यात बैठक झाल्याचे वृत्त माध्यमांत झळकल्यानंतर विरोधकांकडून सुरेश धस यांच्यावर जोरदार हल्लाबोल करण्यात आला. मात्र, या भेटीने कुठलाही फरक पडत नाही, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद फडणवीस यांनी दिली. सुरेश धस आरोपींना शिक्षा झालीच पाहिजे, या हेतूने काम करत आहेत. मात्र, काही लोकांच्या पोटात दुखते, त्यामुळे ते यावर टीका करतात, असेही ते म्हणाले. ते जळगावमध्ये माध्यमांशी बोलत होते. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर भाजपचे आमदार सुरेश धस यांनी धनंजय मुंडे तसेच वाल्मीक कराड यांच्यावर चांगलाच निशाणा साधला आहे. धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्यात मतभेद असले तरी देखील सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेतली होती. त्यामुळे आता हा वाद निवळला आहे का? असा सवाल अनेकांना पडला आहे. भेटीवर विरोधक चांगेलच आक्रमक झाले आहेत. तर सत्ताधारी आपली बाजू मांडत आहेत. त्यातच आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या भेटीवर आपली पहिली प्रतिक्रिया दिली.

कोण कुणाला भेटले याच्यावर राजकारण होत असेल, तर ते लोकशाहीमध्ये योग्य नाही. लोकशाहीमध्ये संवाद हा सुरू राहिला पाहिजे, असे मुख्यमंत्री म्हणाले. बीडमधील हत्याप्रकरणात मी खंबीर भूमिका घेतलेली आहे. खंबीर भूमिका घेत असताना त्या माध्यमातून संवाद तोडून टाकायचा असे करण्याची आवश्यकता नाही, असे ते म्हणाले. धनंजय मुंडे हे देखील राज्याचे मंत्री आहेत, एखादा आमदार एखाद्या मंत्र्याला भेटल्याने कुठलाही फरक पडत नाही, असे देखील मुख्यमंत्री फडणवीस म्हणालेत. सुरेश धस यांनी देखील सांगितले की, भेट घेतली तरी हेतू एकच आहे की सरपंच देशमुख यांच्या मारेकऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे.

## मुंबई मेट्रो मार्ग- ५ ठाणे- भिवंडी- कल्याणच्या कामात ३ वर्षाची दिरंगाई

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :

मुंबई मेट्रो मार्ग- ५ ठाणे- भिवंडी- कल्याण या प्रकल्पामध्ये स्थापत्य कामाच्या खर्चात सद्या तरी कोणतीही वाढ झाली नसली तरी ३ वर्षाची प्रकल्प दिरंगाई हा त्रासदायक आहे.आरटीआयच्या माध्यमातून आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी उघड केलेल्या या माहितीने एमएमआरडीएच्या मेट्रो प्रशासनातील हलगर्जीपणा आणि प्रकल्प व्यवस्थापनातील कमतरता यावर प्रकाश टाकला आहे.

आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखेकडे विविध माहिती विचारली होती. मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखेने अनिल गलगली यांस सविस्तर माहिती दिली. मुंबई मेट्रो मार्ग- ५ ठाणे- भिवंडी- कल्याणचे काम अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीला १ सप्टेंबर २०१९ रोजी देण्यात आले होते.

मुंबई मेट्रो मार्ग- ५ ठाणे- भिवंडी- कल्याण ठाणे हा १५ स्थानके असलेला २४.९१ किमी लांबीचा एलिव्हेटेड कॉरिडॉर आहे. सदर काम १ मार्च २०२२ रोजी पूर्ण करणे अपेक्षित होते. आता नवीन डेडलाईन ही ३१ मार्च २०२५ अशी आहे.

अनिल गलगली यांनी वेळेत काम पूर्ण न करण्यासाठी दंडात्मक कारवाईची मागणी केली आहे. मुंबई मेट्रो मार्ग- ५ ठाणे- भिवंडी- कल्याण या प्रकल्पाचा स्थापत्य कामाचा अपेक्षित खर्च हा ८९८.१९ कोटी इतका आहे. सद्या तरी वाढीव खर्च झालेला नाही. ३ वर्षांची दिरंगाई लक्षात घेता दंडात्मक कारवाई करताना केवळ २०.८८ लाख इतका दंड आकारण्यात आला आहे.

मेट्रो ५ महत्वाचा मार्ग असून सध्या सुरू असलेल्या मेट्रो मार्ग -४ (वडाळा ते कासारवडवली) आणि प्रस्तावित मेट्रो मार्ग- १२ (कल्याण ते तळोजा) आणि मध्य रेल्वे यांच्यात परस्पर एकीकरण साधण्यात येईल.

व्यावसायिक व शासकीय कर्मचारी तसेच ठाणे, भिवंडी व कल्याण परिसरात राहणाऱ्या नागरिकांसाठी हा मेट्रो मार्ग उत्तम सुविधा प्रदान करेल. हा मेट्रो मार्ग सध्याच्या प्रवासाची वेळ ५० % ते ७५ % पर्यंत कमी करेल, असे अनिल गलगली यांनी सांगितले.

## मोबाईल स्नॅचर गुन्हे शाखेच्या जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

बेलतरोडी परिसरात मोबाईल स्नॅचिंग करणाऱ्या आरोपीच्या गुन्हे शाखा युनिट ३ च्या पथकाने मुसक्या आवळल्या. मोहम्मद शफीक मोहम्मद रफीक (३०) रा.मोमिनपुरा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

मनीषनगर परिसरात राहणाऱ्या फिर्यादी प्रेमेंद्र मेश्राम (२४) गत ४ फेब्रुवारीच्या रात्री मित्रासोबत दुचाकी वाहनाने जात होत्या. या दरम्यान त्या कोणाशी तरी फोनवर बोलत होत्या. अजीत बेकरीजवळ दुचाकीस्वार दोन आरोपी मागून त्यांच्याजवळ आले. काही कळण्यापूर्वीच त्यांनी यशस्वी यांच्या हातातील मोबाईल हिसकावला आणि पळून गेले. यशस्वी यांच्या तक्रारीवरून बेलतरोडी पोलिसांनी अज्ञात आरोपींवर जबरी चोरीचा गुन्हा नोंदविला होता. या घटनेचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट ३ चे पथकही करीत होते. सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून पेलिसांनी शफीकची ओळख पटवली. त्याला पकडण्यासाठी पोलिसांनी सापळा रचला. खबऱ्यांना कामावर लावण्यात आले. खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर पोलिसांनी शफीकला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्हा कबूल केला. पोलिसांनी त्याला अटक केली.

## कळमेश्वरमधील बारूद कारखान्यात स्फोट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यात येत असलेल्या बीत्तलवाडी परिसरातील बारूद कारखान्यात रविवारी दुपारी स्फोट झाला. या स्फोटात दोन मजूर ठार झाले असून पाच मजूर गंभीर जखमी असल्याची प्राथमिक माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे. या स्फोटाचे मुख्य कारण अद्याप स्पष्ट झाले नसून जखमी कामगारांना शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले आहे. या स्फोटामुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून गावकऱ्यांनी कंपनीच्या प्रवेशद्वाराकडे मोठी गर्दी केली आहे या स्फोटात मृतांची संख्या वाढण्याची शक्यता असून सध्या पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार घटनास्थळाकडे रवाना झाले आहेत.

एशियन फायर वर्क्स कंपनीत स्फोटामुळे मोठी आग लागली. कंपनीत ठेवलेले सर्व गठ्ठे आणि सामान आगीत जळाले. पोलिसांनी लगेच अग्निशमन दलाला पाचारण केले. काही वेळातच अग्निशमन दलाची सहा वाहने कंपनीत पोहचली. त्यांनी पाण्याचा मारा करीत दोन तास प्रयत्न करुन आगीवर नियंत्रण मिळवले.



दोन कामगाराचा मृत्यू पाच जखमी

त्यानंतर काही वेळातच रुग्णावाहिका पोहचल्या. गंभीर जखमींनी लगेच शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. एशियन फायर वर्क्स कंपनीत स्फोट होताच मोठा आवाज झाला तसेच कंपनीला आग लागली. त्यामुळे आजुबाजुच्या गावातील अनेकांनी कंपनीच्या दिशेने धाव घेतली. काही मिनिटांतच स्फोटाची वार्ता अनेकांपर्यंत पोहचली. त्यामुळे कंपनीत गावकऱ्यांनी मोठी गर्दी केली होती. काही गावकऱ्यांनी कंपनीतील कर्मचाऱ्यांना मदत केली.

कंपनीत काही कामगार दुपारी काम करीत होते. मात्र, रविवार असल्यामुळे काही कामगार कंपनीच्या बाहेर गेले होते. तर दोन कामगार स्फोट होण्याच्या अगदी काही मिनिटांपूर्वीच कंपनीच्या प्रवेशद्वारापर्यंत पोहचले. तेवढ्यातच त्यांना स्फोट झाल्यामुळे आवाज आला. त्यांनी कंपनीबाहेर न जाता कंपनीत स्फोट झाल्याच्या ठिकाणी धाव घेतली.

# महाकुंभ हा सनातनच्या एकतेचा योग : देवेंद्र फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १६ :

महाकुंभ मेळा हा सनातनच्या एकतेचा योग असल्याचे विधान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सत्संग फाऊंडेशन संयोजित आणि व्हॅल्युएबल ग्रुप तर्फे आयोजित महाकुंभप्रयाग योग सोहळ्यात केले. नागपूर येथील रेशीमबाग मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. जगाच्या पाठीवर आस्थेचा एवढा भव्य संगम आजवर कोणत्याही देशाने बघितला नाही. भारतीय संस्कृती आणि सभ्यतेमुळे हजारो वर्षांपासून हा संगम सनातन धमार्ला मानणाऱ्या प्रत्येक घटकांना जात, धर्म, भाषा, पंथ विसरून एकत्रित आणत दिव्य अनुभव देतो, असेही ते म्हणाले.



प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यात ज्या नागरिकांना त्रिवेणी संगमावर पवित्रस्नानाचा लाभ घेता आला नाही त्या नागरिकांकरिता हा विशेष पर्वणी सोहळा आयोजित करण्यात आला होता. यानिमित्त प्रयागराज संगमाचे हजारो लिटर पवित्र जल नागपूरमध्ये आणण्यात आले होते. व्हॅल्युएबल ग्रुपचे अमेय हेटे यांच्या वडिलांच्या संकल्पनेतून शनिवार १५ फेब्रुवारी आणि रविवार १६ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेला हा दोन दिवसीय पवित्र उत्सव नागपूरकरांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम, भक्ती संगीत, सत्संग, कीर्तन, भजन आणि प्रवचनाची पर्वणी घेऊन आला असल्याचे विधान देवेंद्र फडणवीस यांनी केले.

या सोहळ्याच्या पहिल्या दिवशी, शनिवार १५ फेब्रुवारीला पहाटे श्रीगुरुपादुका दर्शन व संगम जल अभिषेक सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी गजानन महाराज मंदिर चौक ते रेशीमबाग मैदान या भव्य मार्गावर निघालेली पादुकांची रथयात्रा व सत्संग फाऊंडेशनचे संस्थापक आणि अध्यात्मिक गुरु पद्मभूषण श्री एम यांच्या आशीर्वचनाने भाविकांना मंत्रमुग्ध केले. भाविकांची शनिवारची सांयकाळ सुप्रसिद्ध गायक कैलास खेर यांच्या भक्तिसंगीताच्या कार्यक्रमात न्हाऊन निघाली.

या कार्यक्रमासोबतच महाराष्ट्रातील विद्वान ब्रम्हवृंदांद्वारे "शिवशक्ती याग", संतांच्या पादुका व जलकुंभ अभिषेक, पवित्र जलाभिषेक इत्यादी कार्यक्रमसुद्धा आयोजित करण्यात आले होते. आधुनिक तंत्राच्या साहाय्याने उपस्थित भाविकांवर प्रयागराजच्या पवित्र तीर्थजलाचा वर्षाव करण्यात आला. या पवित्र सोहळ्यास व आयोजित महाआरतीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नागपूर महानगर संघचालक राजेशजी लोया देखील उपस्थित होते. केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांचे देखील या कार्यक्रमास विशेष सहकार्य लाभले. व्हॅल्युएबल ग्रुपचे संचालक अमेय हेटे यांनी संगमाचे प्रतीक असलेला गंगाजलाचा पवित्र कलश देत देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत आणि सत्कार केला. तर, महाकुंभाचा दिव्य योग आयोजकांनी नागपूरकरांना घरबसल्या दिल्याबद्दल देवेंद्र फडणवीस यांनी अमेय हेटे, नरेंद्र हेटे व सर्व आयोजकांचे आभार मानले. गुरुदेव श्री एम यांच्या सानिध्यात चालणारे सत्संग फाउंडेशन आणि त्याचे काम पाहणारे मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश व राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष सुनील शुक्रे यांचे देखील त्यांनी आभार मानले.

